**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ८८३/२०२२</u>**
**MHSO110030472022**

(राजाराम शिंदे वि. नारायण शिंदे)

## <u>निशाणी क्र. ३१ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी, वादीच्या जमीनीसोबत प्रतिवादीच्या जमीनीची मोजणी होवून, हद्दीखुणा कायम होवून, खुलासेवार नकाशासह अहवाल न्यायालयात दाखल करण्याकरीता न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक व्हावी म्हणून दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २६ नियम ९ प्रमाणे सादर केलेला आहे.

२. प्रतिवादीचे कथन की, वादीने प्रतिवादीविरुध्द अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांचे मार्फत मो.र.नं. ५१८६/२०२१ अन्वये मोजणी केली होती परंतू त्या मोजणीकामी प्रतिवादी हे हजर नव्हते. वादीने केलेली मोजणी ही सदोष व बेकायदेशीर असल्याने सत्य परिस्थिती कोर्टासमोर येण्यासाठी सरकारी मोजणी होवुन, हद्दीखुणा कायम होवुन मिळणेकरीता व मिळकतींची मोजणी करुन त्याबाबत खुलासेवार नकाशासह सत्यस्थिती अभिलेखावर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताचे नेमणुक करुन जागेची पाहणीचा अहवाल आवश्यक असल्याची बाब नमूद करुन न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र ३१ खाली प्रतिवादीच्या मोजणी अर्जास म्हणणे दाखल केले आहे. वादीचा गट क्र ४७८ व प्रतिवादीचा मुळ गट क्र ४८० सह गट क्र ४८०/२ या गटांची पुन्हा मोजणी होवुन हद्दीखुणा दाखविण्यास वादीची हरकत नाही. वादीच्या गटाच्या मोजणीचा खर्च वादी भरणेस तयार आहेत मात्र प्रतिवादीच्या गटाच्या मोजणीचा खर्च प्रतिवादीने भरावा या अटीवर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे विधिज्ञांनी अर्जातील मजकुरानुसार युक्तीवाद केला व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी

मोजणी अर्ज अटीवर मंजूर करण्याची विनंती केली.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २६ व नियम ९ प्रमाणे ज्या दाव्यामध्ये एखादया वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश पाडण्याकरीता स्थानिक अन्वेषण करणेची आवश्यकता भासते तेथे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याची तरतूद आहे. प्रस्तुत दाव्यातील स्वरुप विचारात घेता वादीचा दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लागण्यासाठी सत्यपरिस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक व जरुरीचे आहे. दाव्यातील दोन्ही पक्षकारांचे परस्पर विरोधी कथने नमुद आहेत. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करुन सत्य परिस्थीती समोर आल्यास वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेल्या तंटयाचे नैसर्गीकरित्या कायमचे निराकरण होण्यास मदत मिळणार आहे. प्रतिवादी यांनी युक्तीवादादरम्यान त्यांच्या जमिनीकरीता न्यायालयीन आयुक्त नेमण्यासाठी येणारा खर्च भरण्याची तयारी दर्शविलेली आहे व तसेच वादी यांनी सुध्दा त्यांच्या जमिनीकरीता न्यायालयीन आयुक्त नेमण्यासाठी येणारा खर्च भरण्याची तयारी दर्शविलेली आहे, त्याकरीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादीचा नि.क्र. ३१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक भूमी अभिलेख, माळशिरस यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्तांनी मौजे शिंदेवाडी येथील वादीची जमीन गट क्र ४७८ व प्रतिवादीची जमीन गट क्र. ४८० सह गट क्र ४८०/२ या क्षेत्रांची मोजणी करुन तसा अहवाल नकाशासह दि. ०३/०५/२०२४ पूर्वी न्यायालयात सादर करावा. तसेच न्यायालयीन आयुक्त यांनी अतिक्रमण असल्यास ते नकाशामध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी दावा मिळकतीवर हजर राहणेबाबत वादी व प्रतिवादी तसेच वर नमुद गट क्रमांकाचे धारक व त्यांचे लगतचे गटधारक यांना आगावू सुचना देवून त्यांचे समक्ष सर्वेक्षण करावे.

५. वादी व प्रतिवादी तसेच वर नमुद गट क्रमांकाचे धारक व त्यांचे लगतचे गटधारक यांना आदेश देण्यात येतो की, न्यायालयीन आयुक्तांच्या सुचनेनुसार व ठरविलेल्या दिवशी वादी व प्रतिवादी यांनी त्यांच्या वकीलांसहीत दावामिळकतीवर हजर रहावे.

६. न्यायालयीन आयुक्तांच्या कामकाजासाठी आवश्यक असणारे शुल्क वादी व प्रतिवादी यांनी संबंधीत कार्यालयात ७ दिवसांच्या आत परस्पर अदा करावे.

७. न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचे पत्र उपअधिक्षक भूमी अभिलेख, माळशिरस यांना पाठविण्यात यावे तसेच न्यायालयीन आयुक्तांना आवश्यक सर्व कागदपत्रे वादी व प्रतिवादी यांनी सादर करावीत त्यासाठी आवश्यक पुर्तता वादी व प्रतिवादी यांनी त्वरीत करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2024.03.20 17:37:31 +0530

दिनांक – २०/०३/२०२४

(एम.एन. पाटील)
४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla (Grade III) |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 20 / 03 / 2024. |
| **Order uploaded on** | **:** | 20 / 03 / 2024. |